उप पोलीस स्टेशन राजाराम (खां.) ता. अहेरी जि. गडचिरोली

FIRST INFORMATION REPORT

पहिली खबर

(भारतीय नागरीक सुरक्षा BNSS कलम १७३ अन्वये)

1. State:- महाराष्ट्र राज्य ..... Dist:- गडचिरोली जिल्हा ..... P.S.:- राजाराम खां. पोलीस स्टेशन ..... FIR No.:- 02/2026 पहिली खबर क्र. ..... Year:- 2026 वर्ष ..... Date:- 22/01/2026 तारीख

2. (i) *Act : प्रा. प्र. अधिनियम-1988 अधिनियम ..... *Section :- 7 कलम

(ii) *Act : अधिनियम ..... *Section :- कलम

(iii) *Act : अधिनियम ..... *Section :- कलम

(iv) Other Acts & Sections : इतर अधिनियम व कलमे .....

3. a) Occurence of Offence : Day. बुधवार वार ..... Date from 19/01/026 तारीख पासून ..... Date to 21/01/2026 ता. पर्यंत
अपराधाची घटना
चे 17.15 वा. ..... चे 19.20 वा.

Time Period ..... Time From ..... पासून Time To. ..... पर्यंत
वेळेचा अवधी

b) Information received at P. S. ..... Date 21/01/2026 तारीख ..... Time 21.30 वा. वेळ
पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख व वेळेचा अवधी

c) Occurrence Reg./General Diary Reference Entry Nos. 04 संदर्भ क्र. ..... Time 01.10 वेळ
गुन्हा दाखल झाल्याची सर्वसाधारण रोजनिशीचा
22/01/2026

4. Type of Information: लेखी माहितीचा प्रकार ..... Written/ Oral लेखी/ तोंडी .....

5. Place of Occurence : a) Direction & Distance from P. S. 1 किमी उत्तर अ) पोलीस ठाणे पासून दिशा व अंतर ..... Beat No./Chouki No.: गस्त क्षेत्र क्र./ चौकी क्र. .....
घटनेचे ठिकाण

B) Address राजाराम खां. येथील आलोसे यांचे शासकीय वन निवासस्थान
ब)पत्ता .....

C) In case outside limit of this Police Station then the .....
क) या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नांव

Name of P. S. ..... District ..... State .....
पोलीस ठाणे जिल्हा राज्य

6. Complainant / Informant
तक्रारदार / खबरी

a) Name सरतर्फे श्री. विक्रांत सगणे
नांव

b) Father's / Husband's Name अशोकराव सगणे
पित्याचे / पतीचे नांव

c) Date / Year of Birth 43 वर्ष ..... d) Nationality भारतीय
जन्मतारीख / वर्ष राष्ट्रीयत्व

e) Passport No. ..... Date of Issue ..... Place of Issue .....
पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

f) Occupation नोकरी
व्यवसाय

g) Address पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.विभाग, गडचिरोली
पत्ता .....

Scanned with OKEN Scanner

फिर्याद

उपपोस्टे राजाराम (खां.)
दिनांक २२/०१/२०२६

मी अशोकराव रागणे, वय ४३ वर्ष, व्यवसाय- नोकरी पोलीस उप अधीक्षक, नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली मो. नं. ७७२२०७७६०७ समक्ष उपपोलीस स्टेशन राजाराम (खां.) येथे हजर येवुन सरतर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे दि. ०६/१०/२०२५ रोजी पासुन उपअधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दिनांक १९/०१/२०२६ रोजी तक्रारदार श्री आरमुल्ला बाबु चिन्नापोचम, वय ४९ वर्षे, धंदा- ट्रॅक्टर चालक, रा. रामागुंडम जि. पेदापल्ली, करीमनगर, राज्य तेलंगाना त्यांचे मो. नं. ७३९६६३३३३० वरुन यांनी आम्हास वरील नमुद क्रमांकावर फोन करुन त्यांची एका लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्याचे सांगीतले त्यावरुन आम्ही त्यांना मौजा राजाराम (खां.) ता. अहेरी गावाच्या अलीकडे रोडच्या कडेला हजर राहण्यास सांगुन, कार्यवाहीकरीता लागणारे दोन शासकीय पंचाना पाचारण करुन सापळा कारवाईतील पथक व सापळा कारवाईकरीता लागणारे सर्व साहीत्य सोबत घेवुन शासकीय वाहनासह लाप्रवि कार्यालय गडचिरोली येथुन रवाना होवुन राजाराम (खां) गावाचे अलीकडे पोहचलो. त्यावेळी राजाराम (खां) गावाचे अलीकडे रोडच्या कडेला तक्रारदार त्यांचे दुचाकी वाहनाने हजर होते. त्यानंतर त्यास आम्ही आमची, दोन्ही शासकीय पंच व सापळा पथकातील सदस्याची ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांनी त्यांचे नाव आरमुल्ला बाबु चिन्नापोचम असे सांगुन त्यांचे तक्रारीचे तोंडी हकीकत सांगीतली. त्यानंतर त्यांना कागद व पेन उपलब्ध करुन दिले असता त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरात तक्रार लिहुन आमचेकडे दिली. ती, खालीलप्रमाणे

मैं आज 19/01/2026 को ला.प्र. विभाग गडचिरोली, कॅम्प राजाराम खांदला मे समक्ष उपस्थित आकर शिकायत करता हूँ कि मैं उपरोक्त पते पर रहता हूँ और उपरोक्त रूप में कार्य करता हूँ।

मैं तेलंगाना राज्य के करीमनगर जिला पेदापल्ली के मौजा रामागुंडम का निवासी हूं और मैंने तेलंगाना के रामागुंडम में अपने चाचा के नाम पर एक ट्रॅक्टर पंजीकृत कराया है। वहा काम न मिलने के कारण, पिछले तीन सालो से मै अपने ट्रॅक्टर के साथ गडचिरोली के कोंकापार (राजाराम खांदला) यहा अपनी पत्नी के साथ तिरुपति आउलवार के घर में किराए से रहता हु, और उस इलाके के किसानों के खेतों में काम करके अपना गुजारा करता हुं।

''मैं 12/01/2026 के दोपहर के आसपास कोंकापार गांव के पास स्थित पत्तीगांव गांव के सुधाकर लक्ष्मण कन्नाके की खेती की जुताई के लिए ट्रॅक्टर से काम कर रहा था। तभी राजाराम (खांदला) वन विभाग के दो गार्ड वहां आए और मुझसे कहा, की ''तुम वन भूमि पर अवैध रूप से काम कर रहे हो, आपका ट्रॅक्टर ले जाकर कारवाई करते है!'' इतना कहकर वह ट्रॅक्टर लेकर चले गये। बाद में शाम को राजाराम खांदला के वनपाल श्री धामनगे का फोन नं. 8605911378 से मेरे फोन नं. 6303148837 पर कॉल आया और उन्होंने कहा, की, क्या टीएस 22 टी 8848 यह ट्रॅक्टर आपका है? मेरे हा कहने पर ''आप राजाराम (खां.) स्थित मेरे सरकारी आवास पर आकर मुझसे मिलो'' ऐसा बोले! इसके बाद, तारीख 13/01/2026 के सुबह मैं राजाराम स्थित उनके आवास पर उनसे मिलने गया तब उन्होंने मुझसे कहा, ''अगर मैने ट्रॅक्टर के लिए मुकदमा तैयार करके अदालत में भेजा तो आपको 150,000/- रुपये खर्च करने पडेंगे। लेकिन मेरे स्तर पर केस की तो 25000 रुपये लगेंगे! ऐसे रिश्वत की मांग करते हुए उन्होने कहा, ''मैं अब छुट्टी पर जा रहा हूँ, दो-तीन दिन बाद जब मै छुट्टी से लौटुंगा तो पैसे लेकर क्वार्टर पर मुझसे मिलने आना। इतना कहकर उन्होने मुझे रिश्वत की रकम की मांग की है। उसके बाद से वो बार-बार मुझे फोन करके ट्रॅक्टर पर कम फाईन का केस भेजने के लिए रिश्वत मांग रहे हैं। आज तारीख 19/01/2026 की सुबह मैंने उनसे फोन पर बात की तो उन्होंने मुझे रिश्वत की रक्कम लेकर राजाराम (खां.) स्थित उनके सरकारी आवास पर बुलाया है।

श्री धामनगे वनपाल से मेरी कोई व्यक्तिगत दुश्मनी, कोई वित्तीय लेन-देन या झगडा नही है। लेकिन गार्ड ने जुताई के काम में लगे मेरे ट्रॅक्टर को ताबे मे लेकर उस ट्रॅक्टर के केस मे फाईन कम करके केस भेजने के लिए श्री धामनगे, वनपाल ने 25000 रुपये की रिश्वत मांगी है, लेकीन मैं उन्हें 25000 रुपये की रिश्वत देने को तैयार नहीं हूं। इसलिए उनपर कानुनी कारवाई के लिए मैं अपनी शिकायत ला.प्र. विभाग गडचिरोली, कॅम्प राजाराम (खां.) में दर्ज कर रहा हूं।'' अशा मजकुराची तक्रार दिली आहे. तक्रारदार आरमुल्ला बाबु यांनी दिलेली लेखी तक्रार पंचाना दाखविली. त्यांनतर तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी तक्रार व सोबत जोडलेल्या कागदपत्रावर तक्रारदार आरमुल्ला बाबु यांनी, पंचानी व मी सहया करुन तक्रार ताब्यात घेतली. तक्रारदार यांनी राजाराम (खां.) येथील वनपाल यांचे विरुध्द दिलेली लेखी तक्रार खरी आहे किंवा नाही यांची खात्री करण्यासाठी दि. १९/०१/२०२६ रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन माझे सुचनेवरुन पोअं जुमनाके यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री दिली. त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व तक्रारदार आरमुल्ला बाबु यांचे वक्तव्य घेवुन व्हॉईस रेकॉर्डर तक्रारदार यांचे शर्टाचे आतील बनियानला बांधून दिला व पंच क्र. १ सिनगारे सह श्री धामनगे वनपाल यांची भेट घेण्यासाठी

Scanned with OKEN Scanner

7. Details of known/ suspected / accused with full address (Attach separate sheet if necessary) :

माहित असलेला / संशयीत / आरोपीचा संपूर्ण पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :

श्री. महेश जयंतराव धामनगे वय 47 वर्ष, पद- वनपाल उपक्षेत्र रानारम्य यां. वनपरिक्षेत्र कार्यालय कमलापूर ता. अहेरी जि. गडचिरोली

Attachment to item 7 First Information Report :-

Physical features, deformities and other details of the suspect :

संशयीतांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :-

Sex लिंग	Date/ Year of Birth जन्मतारीख/वर्ष	Build बांधा	Height in Cms. उंची (से.मी. मध्ये)	Complexion वर्ण	Indenification Mark (s) ओळख चिन्हे	Deformities/ Peculiarities व्यंग / वैशिष्ट्ये	Teeth दात	Hair केस
1	2	3	4	5	6	7	8	9
पुरुष	47 वर्ष	मजबुत	172 cm	गवाळ वर्ण	डाव्या गुडघ्याखाली व्रण	—	पूर्ण पिवळसर	पांढरे तुरळक

Eye डोळे	Habits सवयी	Dress Habit (s) पोशाखाच्या सवयी	Languages/ Dialect भाषा/बोली भाषा	PLACE OF			
				Burne Marks भाजल्याच्या खुणा	Leucoderma कोड	Mole तीळ	Scar व्रण
10	11	12	13	14	15	16	17
शाबुत काळसर	तंबाखू, दारू पितो	साधा	मराठी हिंदी	—	—	—	—

Tatto So गोंदण	Forehead कपाळ	Ear कान	Nose नाक	Moustaches मिशी	Speech Voice बोलण्याची पध्दत	Face चेहरा	Lips ओठ
18	19	20	21	22	23	24	25
उजव्या हातावर	शाबुत	शाबुत	शाबुत	नाही	मराठी व हिंदी मिश्रित	गोलाकार	शाबुत

These fields will be entered only if complainant/ informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrival to assist I. O.

जर मेझरदार / खगरहन संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.

A database created will subsequently link one suspect in several cases, if any .

या अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीतांच्या इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल.

A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.

या वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनश्च: तयार करावी.

8. Reasons for delay in reporting by the Complainant/ Informnt :

तक्रारदाराने / खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

लागलीच

9. Particulars of properties stolen / involved (Attach separate sheet if necessary) :

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) :

जप्त मालमत्तेचा तपशील - (1) सॅन्डिस्क कंपनीचे 32 जीबी मेमरी कार्ड - 03 नग
(2) आलोसे यांचा विवो कंपनीचा ॲन्ड्रॉइड मो. फोन कि. अंदाजे 12000/- रु.
(3) आलोसे यांचा हिरव्या रंगाचे डांगरी फुलपॅन्ट कि. अंदाजे 200/- रु

Scanned with OKEN Scanner

राजाराम (खां) येथील शासकीय वन निवासस्थान येथे रवाना करण्यात आले व त्यांचे परत येण्याची प्रतिक्षेत मी, पंच क्र.२ व सापळा पथक त्याच ठिकाणी थांबुन राहीलो. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार आरमुल्ला बाबु व पंच क्र. १ सिनगारे आम्ही थांबवुन ठेवलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आले. तेव्हा तक्रारदार यांचे जवळील व्हाईस रेकॉर्डर माझे सांगणेवरुन पोअं जुमनाकेयांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकार्ड झालेले संभाषण मी तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये धामनगे वनपाल यांनी शेतीची मशागतीचे काम करीत असतांना पकडून नेलेल्या ट्रॅक्टरवर केलेल्या केसचा फाईन कमी करून केस पाठविण्याकरीता १०,०००/- रूपयाची लाचेची मागणी करून राजाराम येथील त्यांचे क्वार्टर येथे तात्काळ स्वीकरण्याची तयारी दर्शविल्याने दोन्ही पंचासमक्ष लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. त्याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर आम्हां सर्वानुमते धामनगे वनपाल यांचे विरूध्द दि. १९/०१/२०२६ रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. तक्रारदार यांनी यांचे बचतीतील १००००/- रू ५०० रू दराच्या एकुण २० नोटा आमचे समक्ष हजर केल्याने आम्ही ते ताब्यात घेवुन पाहणी केली असता त्याचे क्रमांक खालीलप्रमाणे

1	8AS751114	2	4MD 720244	3	3UG578167	4	9VB516008	5	3KG 932266
6	8HN 728153	7	2FQ 933441	8	0EV 223477	9	4GH 343377	10	3BP 444954
11	8RR 641220	12	0RD 723107	13	2QA 996805	14	9LP 173403	15	6DW 520405
16	7AF 324478	17	8HV 287629	18	8MS 029227	19	7RR 241220	20	1GN 186374

त्यावेळी माझ्या सुचनेवरून पोशि नुतेश धुर्वे यांनी ॲथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन तक्रारदार व पंचाना त्याचे प्रात्याक्षीक दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या पाचशे रू. दराच्या २० नोटा एकुण १००००/- रू. रक्कमेला ॲथ्रासीन पावडर लावली. सदरील ॲथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार याच्या शर्टाच्या छाती भागावर डाव्या बाजुस असलेल्या खिशात ठेवल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना पुन्हा सविस्तर सुचना देवुन, रात्रीची वेळ असल्याने वनपाल धामनगे यांनी लाच स्विकारल्यानंतर आमचे फोनवर फोन करून जया काम झाले असे बोलुन इशारा करणेबाबत तक्रारदार यांना सुचना दिली. तसेच सापळा पथकामधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगून तश्या सुचना देण्यात आल्या. त्याबाबत तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर माझे सुचनेवरून पोअ जुमनाके यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील बनियानला बांधुन तक्रारदार आरमुल्ला बाबु यांना पंच क्र. १ सिनगारे यांचे सोबत दुचाकी वाहन क्र. टीएस २२ सी ३६५९ ने वनपाल धामनगे यांना भेटण्यासाठी राजाराम (खां.) येथील वन वसाहतीचे क्वॉर्टर येथे पाठविण्यात आले. त्यांच्या पाठीमागे मी, सापळा पथक व पंच क्र. २ देशमुख असे राजाराम (खां.) येथील शासकीय निवासस्थानच्या परीसरात एकमेकांना दिसतील अशा रितीने सापळा लावुन थांबलो.

त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. १ सिनगारे दोघेही नियोजित सुरक्षीत ठिकाणाकडे जाण्यास निघाले. त्यावेळी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा तक्रारदाराने न केल्यामुळे मी, सापळा पथक व पंच क्र. २ देशमुख यांचेसह त्यांच्या मागोमाग नियोजित सुरक्षीत ठिकाणी परत आलो. माझ्या सुचनेवरून पोअं जुमनाके यांनी तक्रारदार यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्र. १ यांना घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता तसेच व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकार्ड झालेले संभाषण मी तक्रारदार व पंचासमक्ष ऐकले असता, तक्रारदार यांनी धामनगे वनपाल यांना फोन केल्यावर त्यांनी आपण उद्याला पाहू, असे म्हणुन त्यांची भेट न होता लाच रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे ते लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा न करता नियोजित सुरक्षीत ठिकाणी परत आले. तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य यांना गोपणीयता भंग न होवु देण्याकरीताच्या सुचना देवुन तक्रारदार यांना दि. २०/०१/२०२६ रोजी १०.१५ वा. पुढील कारवाई करण्याकरीता सदर ठिकाणी हजर येण्यास सांगुन आम्ही, सापळा पथक व दोन्ही पंचासह शासकीय वाहनाने गडचिरोली येथे रवाना झालो असता, थोडयाच वेळात तक्रारदार यांनी आम्हास फोन करून सांगीतले की, वनपाल धामनगे यांनी मला आताच फोन करून उद्या दि. २०/०१/२०२६ रोजी आलापल्ली येथे भेटण्यास बोलाविले आहे. तरी आपण पुढील कारवाई आलापल्ली येथून करू. त्यामुळे आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह सार्वजनिक बांधकाम विश्राम गृह आलापल्ली येथे थांबण्याचा निर्णय घेवुन तक्रारदार यांना उदईक रोजी १०.१५ वा मौजा आलापल्ली पासुन भामरागड जाणाऱ्या रोडवरील नदीच्या कडेला हजर येण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह सार्वजनिक बांधकाम विश्राम गृह आलापल्ली येथे पोहचुन सविस्तर पंचनामा क्र. १ करण्यात आला.

दि. १९/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी कळविल्याप्रमाणे सापळा कारवाई करण्याकरीता आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक व सर्व साहीत्यासह दि. २०/०१/२०२६ रोजी १०.०५ वा.शासकीय वाहनाने रवाना होवुन आलापल्ली पासुन भामरागड जाणाऱ्या रोडवरील नदीच्या कडेला १०.१५ पोहचलो. थोडयाच वेळात तक्रारदार हे त्यांचे दुचाकी वाहनाने हजर आले. तेव्हा नदीच्या कडेला कॅम्प लावुन लाच मागणी पडताळणी कार्यवाहीची पुन्हा एकदा सविस्तर माहीती देवुन उजळणी करून घेतली. त्यानंतर तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन माझे सुचनेवरून पोअं जुमनाके यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री दिली. त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून त्यामध्ये आमचे, दोन्ही पंचाचे व तक्रारदार आरमुल्ला बाबु यांचे वक्तव्य घेवुन तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलने वनपाल धामनगे यांना फोन केले असता, त्यांनी उद्या दि. २१/०१/२०२६ रोजी

Scanned with OKEN Scanner

उप पोलीस स्टेशन राजाराम (खां.) ता. अहेरी जि. गडचिरोली

10. Total value of properties stolen/ involved :.....
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. Inquest Report / U. D. / A. D. Case No., if any :.....
मरणोन्चेपण अहवाल / यु. डी. /अ. म. प्रकरण क्र., जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required) : .....
पहिल्या खबरीतील थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) : तक्रारदार नामे श्री. आरमुला बाबु चिन्नापोचम वय 44 वर्ष धंदा- ट्रॅक्टर चालक रा. रामागुंडम जि. पेदापल्ली, करीमनगर, राज्य तेलंगाना ह. मु. कोंकापार जि. गडचिरोली यांनी दि. 19/01/026 रोजी लेखी तक्रार दिली की, ते ट्रॅक्टर चालविण्याचे काम करीत असून दि. 12/01/026 रोजी साक्षदार यांचे वनपट्याचे शेतीत मशागतीचे काम करीत असता मौजा राजाराम खां येथील वनविभागाचे गार्ड मार्फत जप्त करण्यात आलेले ट्रॅक्टर संबंधाने कमी रकमेची दंडात्मक कारवाई करुन प्रकरण लवकर पाठविण्याकरीता तक्रारदारास 25000/- लाच रकमेची मागणी केली अशा दिलेल्या लेखी तक्रारी वरुन दोन पंचासमक्ष तक्रारीची पडताळणी केली असता आलोचे यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन 25,000/- लाच रकमेची पंचसाक्षीदारासमक्ष सुस्पष्ट मागणी करुन स्वतःचे आर्थिक फायद्याकरिता साम व भ्रष्ट मार्गाने तडजोडीअंती रु. 10,000/- लाच रकम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आल्याने यांचेविरुद्ध कलम- 7 भ्र.प्र.अधि-1988 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence (s) u/s. : as mentioned at Item No. 2
(1) Registered the case and took up the investigation or
(2) Directed (Name of I. O.) .....
..... Rank No. ..... To take up the investigation or
(3) Refused investigation due to : ..... or
(4) Transferred to P. S. :- Dist. :- State :- on point of jurisdication.

केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले पोलीस निरीक्षक किरण खराटे, ला.प्र.वि. गडचिरोली.
पदनाम ..... यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला/ तपास करण्याचे नाकारले / अधिकारितेच्या मुद्यावर .....पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

(For Cross Entries)

(a) Charge Sheet / Final No.:.....(b) Court Case No.:- .....
दोषारोप क्रमांक/फायनल नंबर कोर्टाचा केस नंबर

(c)Result of Court in short.....
कोर्टाचा थोडक्यात निकाल

(d) V. C. R. / Chowki Reg. No.:- ..... (e) G. C. No.:- ..... (f) K. C. R. No.: .....
व्हिलेज क्राईम नोट बुक/चौकी रजि. नं. सर्वसाधारण शिक्षा नंबर माहितगार गुन्हेगाराचे रजि. नं.

F. I. R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant, free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली. बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/ खबरीला प्रत मोफत दिली.

(R. O. A. C.)

14. Signature/ Thumb impression of the Complainant/ Informnt
तक्रारदाराची / खबरीची सही/ अंगठ्याचा ठसा

Signature of the Office in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

Name : .....
नांव आनंद आवारे
Rank : पोउपनि ..... No. .....
पदनाम क्रमांक
G. P. F. No. : .....
भविष्य निर्वाह निधी नंबर :

प्रभारी अधिकारी
उप.पो. स्टे. राजाराम(खां.)

15. Date & Time of despatch to the Court : 22/01/2026 चे 11.00 वा.
कोर्टात पाठवित्याची तारीख व वेळ

Scanned with OKEN Scanner

आलापल्ली येथे भेटण्यास सांगीतल्याने पुढील कारवाई आलापल्ली येथुन करण्याचा निर्णय घेवुन तक्रारदार यांना उदईक रोजी सदर ठिकाणी सकाळी १०.३० वा. हजर राहण्याच्या सुचना देवुन आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथकासह शासकीय वाहनाने ला. प्र. विभाग गडचिरोली येथे पोहचलो. त्याबाबत तसा सविस्तर स्थगीती पंचनामा क्र. २ करण्यात आला.

त्यानंतर दिनांक २०/०१/२०२६ रोजी दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथक व सर्व साहीत्यासह दि. २१/०१/२०२६ रोजी सकाळी ०७:०० वा. शासकीय वाहनाने रवाना होवुन आलापल्ली पासुन भामरागड जाणाऱ्या रोडवरील नदीच्या कडेला पोहचलो. त्यावेळी तक्रारदार हे सदर ठिकाणी हजर मिळुन आले. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हास दोन्ही पंचा समक्ष सांगीतले की, वनपाल धामनगे यांनी सकाळी मला फोन करून आज संध्याकाळी ०७:०० वा. च्या सुमारास राजाराम खांदला येथील क्वार्टर येथे लाच रक्कम घेवुन बोलाविले आहे. त्यावरून आम्ही सदर सापळा कारवाई राजाराम खांदला येथे दोन्ही पंचासमक्ष निर्णय घेवुन तक्रारदार यांना संध्याकाळी ०६:४५ वा. च्या सुमारास राजाराम खांदला जवळील मरनेली जाणाऱ्या रोडवर कोंकापार गावाजवळ हजर राहण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकासह सदर ठिकाणी पोहचलो असता तक्रारदार तीथे हजर मिळुन आले असता तक्रारदार, सापळा पथक व दोन्ही पंचाना सविस्तर सुचना देवुन, त्यानंतर तक्रारदाराची अंगझडती घेवुन आमचे ताब्यातील ॲथ्रासीन पावडर लावलेली सिलबंद लिफाप्यातील १००००/- रु लाच रक्कम लिफाप्यातुन पोशि धुर्वे यांचे करवी काढून तक्रारदार यांचे शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशात अलगद ठेवले. त्यानंतर आमचे, तक्रारदार व दोन्ही पंचाचे वक्तव्य नोंदवुन तक्रारदार व पंच क्र. १ यांना लाच रक्कम वनपाल धामनगे यांना देण्यास तक्रारदार यांचे वाहनाने १९:०८ वा. रवाना करून त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. २ व सापळा पथक असे वनपाल धामनगे यांचे शासकीय वन निवासस्थान पर्यंत रवाना होवुन तक्रारदार व पंच क्र. १ हे वनपाला धामनगे शासकीय निवासस्थानामध्ये गेल्यानंतर आम्ही सापळा पथक व पंच क्र. २ आजुबाजुस आडोसा घेवुन तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम देण्याचा नियोजित इशाऱ्याची प्रतिक्षा करीत थांबुन राहीलो.

त्यानंतर तक्रारदार यांनी पंच क्र. १ सह गैअ. धामनगे वनपाल यांचे शासकीय वन निवासस्थानाच्या बाहेर रोडवर येवुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला. त्याचवेळी आम्ही, सापळा पार्टीतील सर्व सदस्य व पंच क्र. २ यांचेसह घटनास्थळी पोहचुन पंच क्र. १ सिनगारे यांना लाचेची रक्कम कोणी मागीतली व कोणी स्विकारली असे विचारले असता, त्यांनी तेथे हजर असलेल्या हिरव्या रंगाचा डांगरी शर्ट घातलेल्या इसमाकडे बोट दाखवुन हेच वनपाल धामनगे असुन यांनी तक्रारदार आरमुल्ला बाबु यांचेकडून उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवुन दोन्ही हाताने मोजुन आपल्या फुलपॅंटच्या समोरील उजव्या खिशात ठेवली आहे असे सांगीतल्याने वनपाल धामनगे यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले. त्यांनतर मी वनपाल धामनगे यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर वनपाल धामनगे यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव महेश जयवंतराव धामनगे, वय ४७ वर्ष, व्यवसाय नोकरी पद- वनपाल, वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय कमलापूर, वनविभाग सिरोंचा मुळ पत्ता- रा. बाबुपेठ, वार्ड क्र. २ बालाजी मंदिरजवळ ता. जि. चंद्रपूर असे सांगीतले. त्यानंतर पंच क्र. २ देशमुख यांनी वनपाल धामनगे यांच्या फुलपॅंटच्या समोरील उजव्या खिशामधुन लाचेची रक्कम १००००/- रु. काढून घेवुन सदर नोंटाचे क्रमांक पंचनामा क्र. १ मध्ये नमुद असलेल्या नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. तसेच माझे सुचनेवरून वनपाल धामनगे यांचे हात, लाचेची रक्कम व फुलपॅंटचे समोरील उजव्या खिशाचे आतील भाग अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या सहायाने तपासणी केले असता वनपाल धामनगे यांचे दोन्ही हात, लाचेची रक्कम व फुलपॅंटच्या समोरील उजव्या खिशामध्ये ठिक ठिकाणी निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर १००००/- रु. लाचेची रक्कम पंचासमक्ष लाखेने सिल मोहर करून जप्त करण्यात आले. त्यांनतर पुन्हा माझे सुचनेवरून तक्रारदार आरमुल्ला बाबु यांचे हात व शर्टाचा खिसा अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या साहायाने तपासणी केली असता तक्रारदार यांचे उजव्या हातावर व शर्टाच्या छाती भागावरील डाव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर मी, सापळा पथक, दोन्ही पंच, वनपाल धामनगे असे उप पोलीस स्टेशन राजाराम खांदला येथे आलो. त्याबाबत तसा सविस्तर यशश्वी सापळा पंचनामा क्र. ३ करण्यात आला.

दिनांक १९/०१/२०२६ रोजी वनपाल धामनगे यांनी पंच क्र. १ सिनगारे यांचे समक्ष तक्रारदार यांचेकडे शेतीची मशागतीचे काम करीत असतांना पकडून नेलेल्या ट्रॅक्टरवर केलेल्या केसचा फाईन कमी करून केस पाठविण्याकरीता १००००/- रु. लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर वनपाल धामनगे यांनी दि. २१/०१/२०२६ रोजी १९:२० वा. च्या सुमारास राजाराम खांदला येथील वन वसाहतीचे क्वार्टर येथे पंच क्र. १ सिनगारे यांचे समक्ष उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारून दोन्ही हाताने मोजुन फुलपॅंटच्या समोरील उजव्या खिशात ठेवली म्हणुन माझी महेश जयवंतराव धामनगे वय ४७ वर्ष, व्यवसाय नोकरी पद- वनपाल/क्षेत्र सहायक कार्यालय राजाराम खांदला, वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय कमलापूर, वनविभाग सिरोंचा यांचे विरुध्द कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

(विक्रांत सगणे)
पोलीस उपअधीक्षक,
ला. प्र. विभाग, गडचिरोली

Scanned with OKEN Scanner